| MHRT070001882023 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | २७.०२.२०२३ |
| | नोंदणी दिनांक | २७.०२.२०२३ |
| | निकाल दिनांक | ०५.०६.२०२६ |
| | कालावधी | ०३ व. ०३ म. ०६ दि. |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी के.ए.पोवार)

| **नियमित फौजदारी खटला क्र.१९/२०२३** | **निशाणी क्र.२२** |
|---|---|

**भाग – अ**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>चिपळूण पोलीस ठाणे, चिपळूण,<br>ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्रीमती तळेकर. |
| **आरोपी** | **संतोष सिताराम चव्हाण,**<br>वय – २३ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>रा.लिमये सदन, एस.एम.एस.हॉस्पिटल शेजारी,<br>ता.चिपळुण, जि.रत्नागिरी. |
| **आरोपीं तर्फे विधिज्ञ** | श्री.एस.डी.तावडे |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २८.०१.२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०३.०२.२०२३ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २७.०२.२०२३ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | १४.११.२०२५ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | ०४.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०५.०६.२०२६ |

| | |
|---|---|
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | --- |

**-:: आरोपीची सविस्तर माहिती ::-**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | **संतोष सिताराम चव्हाण,** | दि. १३. ०२. २०२३ | दि. १३. ०२. २०२३ | भा.द.वी. कलम ३५४ (ड) | निर्दोष | -/- | -/- |

**-:: भाग — क ::-**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी-**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| (१) | संजना विष्णू शिंदे | फिर्यादी |

**ब. आरोपी तर्फे साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार -**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोगपक्षाचा पुरावा -**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

ब. आरोपीचा पुरावा –

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

क. न्यायालयीन पुरावा –

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

ड. मुद्देमाल –

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- निरंक -- | | |

## –:: *न्यायनिर्णय* ::–

### (जाहीर दिनांक ०५ जुन, २०२६)

आरोपी हे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ड) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरीता सदर खटल्यास सामोरे जात आहेत.

**अभियोगपक्षाचे कथन संक्षिप्त स्वरूपात खालील प्रमाणे –**

०२. दि.२८.०१.२०२३ रोजी ११.१५ वा. चे सुमारास मौजे खेंड, मारुती मंदिर येथे गुन्हा घडला आहे. फिर्यादी या त्यांच्या पार्लरमध्ये जाण्याकरिता निघाल्या असताना आरोपी मारुती मंदिर या ठिकाणी आला व फिर्यादी यांचेशी लगट करु लागला. तसेच फिर्यादी या मंदिरामध्ये गेल्या असताना आरोपी फिर्यादी यांना म्हणाला की, मला तुझ्याशी बोलायचे आहे असे बोलून तिच्याकडे नजरेने खुणा करुन बाहेर चल असे बोलला व फिर्यादी यांचेशी लगट करुन तिचे मनास लज्जा वाटेल असे वर्तणुक केले.

०३. त्यानंतर फिर्यादी याने पोलीस स्टेशन, चिपळूण येथे जाऊन दि.०३.०२.२०२३ रोजी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. त्यानुसार प्रथम खबरी अहवाल क्र.२५/२०२३ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ड) अन्वये

नोंदविण्यात आला.

०४. न्यायालयाचे समन्स प्राप्त झाल्यानंतर आरोपी हे न्यायालयासमोर हजर झाले. **निशाणी क्र.१३** खाली त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले व त्यांना समजावून सांगण्यात आले. परंतू त्यांनी गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेची मागणी केली.

०५. आरोपींविरूध्द प्रस्तुतचा गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने एकच साक्षीदार तपासला आहे. अभियोगपक्षाचा पुरावा झाल्यानंतर आरोपी यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) चे निवेदन वगळण्यात आले.

०६. शासन तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती तळेकर व आरोपी तर्फे विधिज्ञ श्री.एस.डी.तावडे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यानंतर अभिलेखाचे अवलोकन केले. त्यानुसार खालील मुद्दे माझ्या निष्कर्षाकामी निर्माण झाले. सदरचे मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.२८.०१.२०२३ रोजी ११.१५ वा.चे सुमारास मौजे खेंड मारुती मंदिर, चिपळुण, ता.चिपळुण येथे आरोपीने, फिर्यादीचा चोरुन पाठलाग करुन वरील ठिकाणी गेला व फिर्यादी हिचेशी लगट करुन तिचे मनाला लज्जा वाटेल असे वर्तणुक केली आणि त्यामुळे **भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ड)** प्रमाणे गुन्हा केला आहे? | **नाही.** |
| (२) | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## –:: <u>कारणमीमांसा</u> ::–

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> –**

०७. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी **साक्षीदार क्र.१ म्हणुन फिर्यादी संजना विष्णू शिंदे** यांना **नि.क्र.१८** अन्वये तपासले. त्यांनी तिच्या सरतपासात असे कथन केले आहे की, तिचे पार्लरची वेळ सकाळी ११.०० ते रात्री ०८.०० वा. पर्यंत असते. घटनेची तारीख तिला आठवत नाही. घटना काय घउली हे तिला आठवत नाही. त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. तक्रार अर्जावर तिची सही आहे. सहीपुरते नि.१९ देण्यात आले. सदरील साक्षीदार ही अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने साक्षीदाराचा भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपास घेतला, परंतू त्याद्वारे कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही.

०८. साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून त्यांनी **नि.क्र.१८** वरील न्यायालयासमोर दिलेल्या जबाबामध्ये व पोलीसांकडे दिलेला जबाबातील मजकूरामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे साक्षीदार यांची साक्ष विश्वासार्ह नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेबाबत **निशाणी क्र.२०** वर तडजोड पुरसीस दाखल केली आहे. घटनेचे इतर कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. या ठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या **मदन मोहन अबोट वि. पंजाब राज्य : ए.आय.आर. २००८ एस.सी. १९६९** या न्यायनिर्णयामध्ये असे निर्देषित केले आहे की,

> "*जेव्हा याचिकाकर्त्यावर आरोप केलेले गुन्हे हे पूर्णपणे वैयक्तिक स्वरूपाचे असतात आणि पक्षकारांमधील विवादांवर सौहार्दपूर्ण तोडगा निघाला असेल, तेव्हा खटला चालू ठेवणे न्यायाच्या हिताचे नाही.*"

०९. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या **विजयी सिंग आणि इतर वि. उत्तर प्रदेश राज्य** *: (१९९०) ३ एस.सी.सी. १९०* या न्यायानिर्णयामध्ये असे नमूद केले आहे की,

> ''*फौजदारी प्रकरणांमध्ये पुराव्याचा सामान्य भार नेहमी फिर्यादीवर असतो आणि तो कधीही बदलत नाही. हे मुख्य तत्त्वापासून निघते की जोपर्यंत फिर्यादीद्वारे दोषी सिद्ध होत नाही तोपर्यंत आरोपी निर्दोष असल्याचे गृहित धरले जाते आणि आरोपीला प्रत्येक वाजवी संशयाचा*

*लाभ मिळण्याचा हक्क आहे. पुरावा कायद्याच्या कलम 105 मध्ये समाविष्ट असलेल्या केसेसच्या बाबतीतही सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे खटला स्थापन करण्याचे प्रारंभिक ओझे पार पाडण्याचे कर्तव्य फिर्यादीने सोडलेले नाही.*''

१०. अभियोगपक्षाने ही बाब शाबीत केली नाही की, दि.२८.०१.२०२३ रोजी ११.१५ वा.चे सुमारास मौजे खेंड मारुती मंदिर, चिपळुण, ता.चिपळुण येथे आरोपीने, फिर्यादीचा चोरुन पाठलाग करुन वरील ठिकाणी गेला व फिर्यादी हिचेशी लगट करुन तिचे मनाला लज्ञा वाटेल असे वर्तणुक केली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ड) अन्वये गुन्हा केला. वरील कारणांमुळे आरोपींचे विरुध्द नमुद दोषारोप निर्विवादपणे सिध्द होत नाही म्हणून मी मुद्दा क्र.१ नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u> –**

११. मुद्दा क्र.१ चे नकारार्थी निष्कर्षामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीने दिलेली फिर्याद एक तर खोटी असली पाहीजे किंवा फिर्यादी खोटे बोलत असला पाहिजे. परंतू, फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांनी **नि.क्र.२०** वर न्यायालयाबाहेर तडजोड झाले बाबत पुरशीस दाखल केली आहे. तसेच, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे परिचयातील असल्यामुळे त्यांच्यामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारे वाद वाढू नयेत म्हणून त्यांच्या विरुद्ध कारवाई करणे योग्य वाटत नाही. म्हणून, मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## <u>आ दे श</u>

१) **आरोपी संतोष सिताराम चव्हाण** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ड) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचा जामीन कतबा व जात मुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये

रु.५०,०००/- चा लायक जामीनदाराचा जामीन कतबा व जातमुचलका देणेचा आहे.

(खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

POWAR KEDAR ARVIND Digitally signed by POWAR KEDAR ARVIND Date: 2026.06.05 17:02:32 +0530

ठिकाण – चिपळुण
दिनांक – ०५.०६.२०२६

**(के. ए. पोवार)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चिपळुण

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | **Mr. S. J. Thorat** |
| Name of Court | **C.J.J.D. & J.M.F.C., Chiplun.** |
| Date of publish | 05.06.2026 |
| Order Signed by the P.O. on | 05.06.2026 |
| Order Uploaded on | 05.06.2026 |